नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 22/12/2022 (गुरूवार) दुपार

---

## अवैधरीत्या धारदार व घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीला अटक

### —: स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण ची कारवाई :—

पोस्टे कन्हानः— दिनांक २१/१२/२०२२ चे १९.०० वा. ते १९.४५ वा. दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेचे पथक हे पोलीस स्टेशन कन्हान परिसरात पेट्रोलिंग व अवैध धंदयावर रेड कामी गेले असता मुखबिरव्दारे गुप्त माहिती मिळाली की, पोलीस स्टेशन कन्हान हद्दीतील प्रगती नगर सुपर टाउन कन्हान येथे राहणारा आरोपी नामे— जिगर राजेश कनोजिया हा वस्ती मध्ये हातात तलवार घेवुन सार्वजनिक ठिकाणी फिरत आहे. अशा मिळालेल्या माहितीवरून सदर इसमावर रेड करणे कामी प्रगती नगर सुपर टाउन कन्हान येथे गेले असता एक इसम उभा दिसला त्याला त्याचे नाव विचारले असता त्याने आपले नाव जिगर राजेश कनोजिया, वय २३ वर्ष, रा. प्रगती नगर सुपर टाउन कन्हान असे सांगीतले वरुन आरोपीस ताब्यात घेवुन त्याचे जवळ असलेली एक पांढऱ्या धातुची तलवार किंमती अंदाजे १,०००/— रू. ची जप्त करुन आरोपीविरूध्द पोलीस स्टेशन कन्हान येथे अप.क्र. ७४३/२०२२ कलम ४, २५ भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा नोंदवुन आरोपीला जप्त मुद्देमालासह पुढील कायदेशीर कार्यवाही करीता पोलीस ठाणे कन्हान यांचे ताब्यात देण्यात आले आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार मेश्राम ब.नं ३८१ पोलीस स्टेशन कन्हान मो नं ९८२३४५३१६९ हे करीत आहेत.

सदरची कार्यवाही ही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक अनिल राऊत, पोलीस हवालदार विनोद काळे, नाना राऊत, पोलीस नाईक प्रणय बनाफर, विरेंद्र नरड चालक पोलीस हवालदार ज्ञानेश्वर पाटील यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.




<u>**जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा**</u>

<u>**पो.स्टे. खापा**</u> :— दिनांक २६/०५/२०२२ चे १३.५० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सौ. मथुरा भजन कवरेती, वय ३२ वर्ष, रा. वाकोडी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापा येथे अप. क्र. १४७/२०२१ कलम ३०२ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक २५/०५/२०२१ चे २१.०० वा. ते २२.०० वा. फिर्यादीने तिचे पति आरोपी नामे— भजन मेहताब कवरेती, वय ४० वर्ष, रा. वाकोडी यास दारू पिण्यास पैसे देण्यास नकार दिल्याने यावरून आरोपी हा चिडला व आरोपीला मुलगा नाही तर मुलगी पाहीजे होती असे म्हणुन मृतक मुलगा सत्यम कवरेती, वय ०१ वर्ष याचे पायाला धरून अंगणातील दगड गोटयावर क्रुरतेने आपटुन जिवानीशी ठार केल्याचे फिर्यादीचे तोंडी रीपोर्टवरून सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर प्रकरणाचे तपास पोलीस निरीक्षक श्री. अजय केशवराव मानकर, पोस्टे खापा यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक २२/१२/२०२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. **अली** यांनी वरील नमुद आरोपीला कलम ३०२ भादंवि मध्ये आजीवन कारावास व २०००/—रू. दंड, दंड न भरल्यास ०१ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्री. आशावरी पालसोडकर यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन मनापोशि/१७१७ वर्षा धुर्मळ, पोस्टे खापा यांनी मदत केली आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**